२०१५ ला निरोप देऊन २०१६ चे महिन्याच्या १ तारखेला 'मॅजिक ऑफ 'लोक

'इको निडस् फाऊंडेशन'

# र्यावरणप्रेमींचा दारूबंदीचा संकल्प

रण क्षेत्रात वेगवेगळ्या
ळ्यांवर काम करून पर्यावरण
र्धनाची चळवळ उभी करणाऱ्या
फाऊंडेशनने नवीन वर्षात
ळ राबविण्याचा संकल्प केला
त गावोगावी जाऊन
दारूबंदीचे ठराव घ्यायचे
ना दारूबंदी करायला भाग
ल राहणार असल्याचे संस्थेचे
द आगळे यांनी सांगितले.
ाऊंडेशन ही पर्यावरण क्षेत्रात
ा आहे. काही तरुणांनी एकत्र



येऊन २००५ मध्ये या संस्थेची स्थापना केली. तीन वर्षांपूर्वी संस्थेने जलस्रोत बचाव अभियान हाती घेतले. याअंतर्गत औरंगाबाद शहरातील सुखना आणि खाम या दोन नद्यांना पुनरुज्जीवित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. वर्षभर प्रत्येक रविवारी दोन्ही नद्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबविली गेली. त्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शहरातील पर्यावरणप्रेमींनी हिरीरीने सहभाग नोंदविला. आता या संस्थेने नवीन वर्षात औरंगाबाद जिल्ह्यात दारूबंदीची चळवळ राबविण्याचा संकल्प केला आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रियानंद आगळे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील गावागावांमध्ये जाऊन लोकांमध्ये जागृती करायची. ग्रामसभेत दारूबंदीचे ठराव घ्यायचे आणि त्यानंतर प्रशासनाला दारूबंदी करण्यास भाग पाडायचे, असे संस्थेचे प्रयत्न राहणार आहेत. संस्थेच्या वतीने आतापर्यंत तीन आंतरराष्ट्रीय परिषदा घेण्यात आल्या. यापुढील परिषदांमध्येही दारूबंदीचा विषय राहील.

### संस्थेचे पदाधिकारी

अध्यक्ष- प्रियानंद आगळे, सचिव- रोहित थोरात, अ‍ॅड. अत्तदीप आगळे, विनय सरोदे, मनीषा जाधव, रेखा गायकवाड, नीलेश दंडे, अभय भोसले, दीपक आंधळे, सचिन शिरसाट आदी.



इको निडस् फाऊंडेशन तर्फे घेण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे छायाचित्र.